भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक ३०.०५.२०२० ते ०३.०६.२०२०)

| अंक ४२/२०२० | दिनांक २९.०५.२०२० | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (२२/०५/२०२० ते २८/०५/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता ३०/०५/२०२० ते ०३/०६/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२/०५ | २३/०५ | २४/०५ | २५/०५ | २६/०५ | २७/०५ | २८/०५ | दिनांक | ३०/०५ | ३१/०५ | ०१/०६ | ०२/०६ | ०३/०६ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ० | ४ | १४ | ५९ | २३ |
| ३७.० | ३८.० | ३९.० | ३९.० | ३६.० | ३७.० | ३७.० | कमाल तापमान (अं. से) | ३७ | ३६ | ३५ | ३४ | ३३ |
| २५.५ | २६.० | २५.५ | २६.० | २६.० | २६.५ | २६.० | किमान तापमान (अं. से) | २५ | २४ | २३ | २२ | २१ |
| निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | सकाळ - मेघाच्छादन (ऑक्टा.) | ३ | ८ | ८ | ८ | ८ |
| ढगाळ | ढगाळ | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | दुपार - मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ८५ | ८५ | ८० | ८५ | ७५ | ७५ | ८५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ८६ | ८५ | ८९ | ८८ | ८८ |
| ४८ | ४५ | ४५ | ४५ | ५५ | ४८ | ४८ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५१ | ५० | ५५ | ७२ | ७४ |
| २.२ | २.६ | २.७ | २.५ | २.४ | १.६ | २.८ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ०११ | ०११ | ००९ | ००७ | ०२१ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ - वा-याची दिशा | उत्तरोत्तर /वायव्यकडे | उत्तरोत्तर /वायव्यकडे | पश्चिमे कडे | पुर्वे कडे | दक्षिणोत्तर आग्नेय कडे |
| पश्चिमोत्तर /नैऋत्य | पश्चिमोत्तर /नैऋत्य | पश्चिमोत्तर /वायव्य | पुर्वोत्तर /आग्नेय | पश्चिमोत्तर /नैऋत्य | पश्चिमोत्तर /नैऋत्य | पश्चिमोत्तर /नैऋत्य | दुपार - वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ३.२ | ०.० | ३.२ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये येत्या पाच दिवसामध्ये तापमानामध्ये घट होण्याची शक्यता आहे, त्याचबरोबर दिनांक ३० मे रोजी तुरळक ठिकाणी, ३१ मे रोजी काही ठिकाणी तर ०१, ०२ व ०३ जून, २०२० रोजी बहतांश ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून हवामान आर्द्र व मुख्यत्वे ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून वर्तविण्यात आला आहे

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात, नागली | रोपवाटीका व्यवस्थापन व पेरणी | या आठवड्यात मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने खरिप पीकांच्या पेरणीस सुरुवात करावी. भातासाठी रोपवाटिका तयार करावयाच्या क्षेत्रामध्ये प्रती गुंठा १ किलो युरिया, ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट व चांगले कुजलेले शेणखत दयावे. बियाण्यास प्रती २ ग्रम याप्रमाणे थायरम किंवा इमिसान हे औषध चोळावे. वाफ्यावर पेरणी करताना ७ ते ८ सेमी अंतरावर ओळीमध्ये साधारण २ सेमी खोलीवर बी पेरावे आणि ते झाकून घ्यावे. जाड दाण्याच्या जातीकरीता ४० किलो तर संकरीत जातीकरीता २० किलो बियाणे वापरावे. नागली आणि वरी पीकांची पेरणी देखील भाताप्रमाणे करावी व बियाणे विरळ पेरावे त्यामुळे रोपे जोमदार होतील.<br>भात रोपवाटीकेतील तणांच्या नियंत्रणाकरीता पेरणीनंतर वाफे ओले होताच ताबड्तोब किंवा ५ ते ६ दिवसांपर्यंत परंतु तणे उगविण्यापुर्वी ब्युटॅक्लोर ५% क्रियाशिल घटक (मॅचेट) हे तणनाशक ६० मिलि प्रती १० लि. पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. फवारणी करताना पाठीवरच्या नॅपसॅक पंपाने मागे सरत फवारणी करावी.<br>ज्या ठिकाणी गादि वाफे करणे शक्य नसेल तर रोपे तयार करण्यासाठी शेतातील उंचवठ्याची जागा निवडावी. व चारही बाजूंनी खोल चारी काढावी यामुळे पाऊस जास्त झाला तरी पाण्याचा निचरा होण्यास मदत होईल व कोवळी रोपे मरण्याचे प्रमाण कमी राहिल. |
| भुईमुग | पुर्व मशागत व पेरणी | जमिन मध्यम ते भारी आणि चांगला निचरा होणारी निवडावी. जमिन खोल नांगरुन भुसभुशित करावी. शेवटच्या कुळवणीपुर्वी हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट मातीत मिसळून घ्यावे.<br>खरीप हंगामातील भुईमुगाची पेरणी १० ते २० जून पर्यंत करावी. या आठवड्यात हलका पाऊस पडण्याची शक्यता असल्याने भुईमुगाच्या पेरणीची पुर्व तयारी करावी. |
| आंबा | काढणी व नवीन लागवड | येत्या आठवड्यामध्ये वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे नविन लागवड केलेल्या आंबा कलमांना काठीचा आधार दयावा. त्याचबरोबर उन्हापासून संरक्षणासाठी शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी.<br>जिल्ह्यामध्ये आंबा पीकामध्ये काही ठिकाणी अंड्याच्या आकाराची फळे व मोठया आकाराची काढणीची फळे अशी अवस्था आहे. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर नूतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ टक्के (चौदा आणे) पक्वतेला काढावीत.<br>काढलेली फळे साका टाळण्यासाठी व उष्णतेपासून बचाव करण्यासाठी सावलीत ठेवावीत. शिफारसीनुसार बुरशीनाशकाची व ईथीलीनची प्रक्रिया देवून पिकवावीत. शक्यतो आंब्याची वाहतूक रात्रीच्यावेळी करावी. आंबा फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारु नये. |
| काजु | नवीन लागवड | येत्या आठवड्यामध्ये वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे नविन लागवड केलेल्या काजू कलमांना काठीचा आधार दयावा. त्याचबरोबर उन्हापासून संरक्षणासाठी शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी.<br>काजूच्या झाडाला रोठा किड लागली असल्यास पाने पिवळी पडतात व खोडामधून छिद्रादवारे भुसा बाहेर पडलेला दिसतो. काजूवर खोडकिडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढळून आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी. लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. किंवा ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळवून चांगला भिजवावा. (एका झाडासाठी ५ लिटर पाणी या प्रमाणात वापरावे) |
| नारळ | फळविकास | येत्या आठवड्यामध्ये वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्यामुळे नविन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांना काठीचा आधार दयावा. त्याचबरोबर उन्हापासून संरक्षणासाठी शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी. |
| आंबा, काजू,, नारळ, व सुपारी | नवीन लागवड | आंबा, काजू, नारळ, सुपारी इ. फळझाडांची नवीन लागवड करावयाच्या जागेत जंगली झाडे-झुडपे काढून साफसफाई करुन घ्यावी. आंब्याच्या लागवडीसाठी 10 × 10 मी. अंतरावर 1 × 1 × 1 मी. आकाराचे, काजूसाठी 7 × 7 मी. अंतरावर 0.6 × 0.6 × 0.6 मी. आकाराचे, नारळासाठी 7.5 × 7.5 मी. अंतरावर 1 × 1 × 1 मी आकाराचे आणि सुपारीसाठी 2.7 × 2.7 मी. अंतरावर 0.6 × 0.6 × 0.6 मी. आकाराच खडडे खोदून उन्हात चांगले तापत ठेवावेत. तयार केलेले खडडे 3 ते 4 घमेली शेणखत किंवा कंपोस्ट आणि 1 कि. सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरुन घ्यावेत. |
| भाजीपाला | | भाजीपाला पीकांमध्ये मिरची, वांगी, टोमॅटो, भेंडी, काकडी, कारली, पडवळ, चिबूड, शिराळी ई. पीकांची लागवड करण्यास योग्य हवामान असून पाऊसाचा अंदाज पाहून पेरणी करावी. तसेच पेरणीसाठी सुधारीत जातीचे बियाणे वापरावे. भेंडीची लागवड सरी-वरंब्यावर करावी. वेलवर्गीय भाजीपाला पीकांसाठी मातीचे ऊंचवटे करुन त्यावर मध्यभागी लागवड करावी. |
| कुक्कटपालन | | कोंबड्यांना रानीखेत रोगापासून संरक्षण करण्यासाठी पशुवैदयकांच्या मार्गदर्शनाखाली लसीकरण करुन घ्यावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डा. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विदयापीठाच्या, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उदयानविदया महाविदयालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डा. प्रदिप च. हळदवणेकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) | डा. यशवत चु. मठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|